वार्तापत्र

जा.क्र३८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :–२५/०७/२०१८

## "अमली पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस तीन महीणे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे भंडारा येथिल संतकबिर वार्ड येथे राहणारा ईसम विशाल उर्फ बिस्सी देवेंद्रसिंग तोमर वय २३ वर्ष, रा. संत कबीर वार्ड, काजी नगर भंडारा हयाने ब्राउन शुगर अमली पदार्थ अवैध बाळगल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक २५.०७.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस तीन महीणे सश्रम कारावास व १०००/–रु. द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

गुन्हयाची हकीकत अशी की, अमली पदार्थ विरोधी शाखेचे तत्कालीन प्रमुख स.पो.नि. नारायन सावणे यांना मिळालेल्या माहीतीचे आधारे दिनांक १९.१०.२०१६ रोजी विशाल उर्फ बिस्सी देवेंद्रसिंग तोमर, वय २३ वर्ष, रा. संत कबीर वार्ड काजी नगर भंडारा याचे घरी अमली पदार्थ कायदया अंतर्गत कायदेशिर घर झडती घेवुन आरोपीचे घरझडती मध्ये अवैध्यरित्या ब्राउन शुगर वजन ०३ ग्रॉम, ४१० मिली ग्रॉम, किंमती ३४१०/– रु. चा माल मिळुन आल्याने स.पो.नि. सावणे यांनी आरोपी विरूध्द कार्यवाही करीता सरकार तर्फे पोलीस ठाणे भंडारा येथे तक्रार दिल्यावरून अपराध क्र. ३२१०/१६ कलम एनडीपीएस ॲक्ट २२ अन्वये आरोपी विरूध्द गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सपोनि. वाय. एच. किचक यांनी सुरू केला. आरोपीस तात्काळ अटक करून, गुन्हयात साक्षपुरावा गोळा करून आरोपपत्र विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३/१७ अन्यवे न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक

२५.०७.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी विशाल उर्फ बिस्सी देवेंद्रसिंग तोमर, वय २३ वर्ष, रा. संत कबीर वार्ड, काजी नगर भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम** २२ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ **अन्वये तीन महीणे सश्रम कारावास व १,०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.** संदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, सुधाकर चव्हान यांचे मार्गदर्शनात पो.हवा. हषवर्धन मेश्राम यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीत